# घटना व नियम

# विदर्भ पेट्रोलियम डिलर टेडर्स असोसिएशन ची घटना व नियम

१. **संघाचे नांव :** विदर्भ पेट्रोलियम डिलर टेडर्स असोसिएशन हे राहील आणि खाली दिलेल्या नियमामध्ये त्याचा संघ असा निर्देश केला जाईल.

**कार्यक्षेत्र** : विदर्भ विभाग

२. **उद्दिष्टे :**

अ) संघांची उद्दिष्टे खाली दिलयाप्रमाणे राहतील.

१) पेट्रोलियम उद्योगातील विदर्भ विभागातील नागपूर क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत येणाऱ्या चारही सरकारी पेट्रोल कंपण्याचे/उद्योगाचे पंप मालक यांची संघटना करणे आणि त्यांना एकत्रित आणे व त्याचे कंपनीशी/ उद्योगाशी असलेले संबंध विनियीमत करणे आणि दृढ करणे.

२) संघ सदस्यांना उद्योगकडून/कंपनीकडून मिळणाऱ्या सेवेत सुस्थीती प्राप्त करून देणे.

३) संघ सदस्यांच्या समस्या दूर करण्याचा प्रयत्न करणे.

४) उद्योगाकडून संघ सदस्यांना होणरा पेट्रोलियम पूरवठा अचूक माप व गुणवत्तेसह संघ सदस्यांना/ पंपधारकांना पंपावर मिळवून देणे.

५) उद्योगाकडून संघ सदस्यांना पूरवठा करतांना जे निकष लावले तेच निकष उद्योगातील अधिकाऱ्यांनी संघ सदस्यांच्या पंपावरील नमुने तपासनीकरीता वापतील यासाठी संघाने प्रयत्न करणे.

६) उद्योगाकडून पेट्रोलियम पूरवठा करतांना विशेषता आईल पूरवठा करतांना संघ सदस्यांच्या गरजेनुसार व त्यांनी केलेल्या मागणी नुसारच पूरवठा करण्यात यावा तसेच याबाबतीत उद्योगाकडून कोणतीही जोर जबरदसती होऊ नये म्हणून संघाने प्रयत्न करणे.

७) उद्योगाकडून पूरवठा होणाऱ्या यंत्राची तपासणी करून अचूकतेबद्दल शहानिशा करणे.

८) उद्योगाकडून मिळणाऱ्या सबसीडी मध्ये वाढ करण्याच्या प्रयत्न करणे.

९) संघाने पंप मशिनच्या एक लिटर, Calibration साठी संघाने प्रयत्न करणे.

१०) वजनमाप विभागाकडून मिटरिंग सूनीटला लावलेले सिल जर सुस्थीतीत असेल तर संघ सदस्यावर काहीही कारवाई होऊ नये यासाठी संघाने प्रयत्न करणे.

११) उद्योगाकडून पुरवठा करण्यात आलेले आईल डब्बे अथवा ड्रम लिकेज असेल तर उद्योगाकडून कंपनीकडून ते बदलून घेणे बाबत संघाने मध्यस्थी करणे.

१२) संघ सदस्यांच्या पेट्रोल पंपावर कंपनीकडून पेट्रोलियमसाठा करण्यासाठी दिलेली भूमीगत टाकी गळतीमुळे व बाष्पीभवनामुळे होणाऱ्या नुकसानाची उद्योगाकडून/कंपनीकडून भरपाई करून घेण्यासाठी संघ प्रयत्न करेल.

१३) इथेनॉल पेट्रोलमध्ये मिसळतांना कंपनीकडून उद्योगाकडून निष्काळजीपणा घडल्यास ग्राहकाच्या गाडयामध्ये होणाऱ्या बिघाडास व त्यांना लागलेल्या दुरूस्ती खर्च कंपनीकडून मिळवून देणे.

१४) ग्राहकाने संघ सदस्यांच्या पंपाविषयी केलेल्या खोटया किंवा खोडसाळ तक्रार विषयी संघ सदस्यांना वेळीस धरले जाऊ तये. तसेच खोटया किंवा खोळसाळ तक्रार कर्त्यांवर कोर्ट कारवाई करण्याच्या दृष्टीने संघाने प्रयत्न करणे.

१५) संघ सदस्यांच्या पंपावर कार्यरत असणाऱ्या कर्मचारी वर्ग व पंपधारक यामधला दुवा बनून सुसंवाद प्रस्थापीत करणे.

१६) भारतातील इतर पेट्रोलियम उद्योगाचे संबंधीतील हया उद्योगाच्या संदर्भात माहिती मिळविणे.

१७) भारतातील सारखीच उद्दीष्टे असलेल्या मालक/टेडर्स असोसिएशन संघटनांना मदत करणे.

१८) हया नियामात उल्लेखिलेल्या उद्दिष्टाच्या प्रयत्नासाठी भारतातील ट्रेड यूनीयन अधिनियमानुसार भारतातील ट्रेड यूनीयनला मदत करणे.

१९) साधारणपणे, सदस्याची सामाजिक, आर्थिक, नागरी आणि शैक्षणिक स्थिती सुधारण्यासाठी आवश्यक असलेले सर्व उपाय योजने.

२०) ही उद्दिष्ट साध्य करण्याकरिता महाराष्ट्र राज्यात संघाच्या विविध भागात केंद्रे संघटीत करता येईल.

२१) भारतीय जिवनमूलयावर आधारीत ट्रेड युनीयन संघटना देशहीत, उद्योगहीत, व संघ हितोन्मुख करयाचा प्रयत्न करणे.

२२) संघाच्या सदस्यांना त्याच्या अडचणीकरिता आर्थीक मदत करणे.

२३) संघाच्या जमा असलेल्या निधीमधून नियमाप्रमाणे सदस्यांना आणि इतरांना कर्ज देणे व वसूल करणे.

**३) सदस्यता :**

हिन्दुस्थान पेट्रोलियम उद्योगाचे विदर्भातील सर्व विक्रेते आणि १८ वर्ष पूर्ण झालेल्या कोणत्याही व्यक्तीला खालील अटिवर संघाचे सभासद होता येईल. प्रवेश शुल्क रू. १०००/— देण्यास तयार असेल तर मासिक वर्गणी रू. १००/— किंवा वार्षिक वर्गणी रू. १२००/— देण्यास तयार असेल तर, संघाची घटना व उपनियमाचे पालन करण्यास तयार असेल तर, तसेच संघाच्या सभासद होतेवेळी त्यास उद्योगातील अन्य कोणत्याही ट्रेड युनियनाचा सभासद नसेल तर संघाचा सभसद होता येईल. सभासदस्याचा अर्ज संघाच्या व्यवस्थापन समीतीने मान्य करावा लागेल.

**४) मानसेवी सदस्यांना प्रवेश :**

ज्या व्यक्ती संघाने सामान्य सदस्य होण्यास पात्र नसतील त्यांना व्यवस्थापन समितीवर निवडून देता यावे किंवा स्विकृत करून घेता यावे याकरिता संघाचे श्यानसेवी सदस्य म्हणून दाखल करून घेता येईल. त्यांच्या पदावधीत ते संघाचे मानसेवी सदस्य राहतील. भारतीय ट्रेड युनीयन अधिनियम १९२६ च्या कलम २२

मध्ये उपविधी (२) अन्वये या सदस्याची संख्या एकुण कार्यकारीणी पदाधिकाऱ्याच्या १/३ किंवा ५ या दोन्ही पेक्षा जो कमी असेल, त्यापेक्षा अधिक राहणार नाही. तसेच उपविधी (३) अन्वये मंत्री परिषदेचा सदस्य किंवा केंद्र शासन अथवा राज्य शासन यांच्याकडील लाभदाया पद (ऑफीस ऑफ प्रॉफीट) धारण करणारे कोणतीही व्यक्ती नोंदणीकृत ट्रेड युनीयनच्या कार्यकारणी परिषदेवर अथवा कार्यकारणीवर सदस्य म्हणून राहू शकणार नाही.

**५) दंड आणि जप्ती :**

व्यवस्थापन समितीच्या परवानगीने सहा महिनेपर्यंत आपली मासिक वर्गणी न भरणारा किंवा उपरोक्त समितीच्या परवानगीशिवाय ३ महिने पर्यंत वर्गणी न भरणारे सदस्य संघाच्या सदस्य म्हणून राहणे रद्द होईल परंतु आपली थकबाकी भरल्यानंतर त्याला संघात पुन्हा येण्याचा हक्क राहील.

**६) लाभ :**

कोणताही सदस्य निदान सहा महिनेपर्यंत सदस्य असल्याशिवाय आणि सर्व अंशदाने दिलेले असल्याशिवाय त्याला संघाचे आपल्या सदस्याला द्यावयाचे ठरविलेले कोणतेही लाभ मिळण्याचा हक्क राहणार नाही.

**७)** ज्याची वर्गणी किंवा देय रक्कमा भरावयाच्या राहिल्या आहेत. अशा संघ सदस्यांना त्याने सर्व बाकी रक्कमा भरल्याशिवाय आणि बाकी रकमा भरल्या त्या तारखेपासून दोन महिन्याच्या कालावधी झाला असल्याशिवाय कोणताही लाभ मिळण्याचा हक्क राहणार नाही.

**८)** व्यवस्थापन समितीच्या मंजुरीशिवाय किंवा संमतीशिवाय संघाचे सभासद संपावर गेल्यास ते कोणत्याही लाभास पात्र राहणार नाही.

**९) सदस्याची नोंदवही :**

आपल्या सर्व सदस्याची नावे आणि त्यांचे कामाचे ठिकाण त्याचे निवासस्थान इत्यादीचा तपशिल असलेली एक नोंदवही संघाने ठेवली पाहिजे.

१०) ही नोंदवही संघाच्या मुख्य कार्यालयात सुटयाचे दिवस सोडून इतर कोणत्याही दिवशी कार्यालयीन वेळेमध्ये कोणत्याही सदस्याला किंवा अधिकाऱ्याच्या तपासणीसाठी ठेववण्यात येईल.

**ब) संचालक मंडळ :**

हे त्रिवार्षिक निवडणूक पध्दतीने निवडले जाईल. संस्थापक, आजिवन आणि वार्षिक सदस्य हे हया संचालक मंडळाची निवड करतील.

११) संघास पुढीलप्रमाणे पदाधिकारी राहतील.

अ) एक अध्यक्षब) तीन उपाध्यक्ष क) एक सचिव ई) तीन सहाय्यक सचिव उ) एक कोषाध्यक्ष उ) (अ) तीन सहकोषाध्यक्ष ऊ) नऊ कार्यकारी सदस्य असे एकूण २१ पदाधिकारी राहतील. या सर्वाची निवड संघाच्या वार्षिक सभेत होईल. परंतु सदर्हु सभेत सर्व संमती होऊ शकली नाही तर (Representation of People Act) १९५१ वे अंतर्गत तरतूदीनुसार गोपनिय मतदान पध्दतीने निवडणूक घेण्यात येईल आणि ते फेरनिवडणूकीस पात्र राहतील.

**अ) जिल्हाउपसमिती**

१) एक जिल्हा उपाध्यक्ष २) एक जिल्हा सहसचिव ३) एक जिल्हा सहकोषाध्यक्ष असे एकूण ३ पदाधिकारी राहतील. या सर्वाची निवड संघाच्या वार्षिक सभेत होईल. परंतु सदर्हु सभेत सर्व संमती होऊ शकली नाही तर Representation of People Act) १९५१ वे अंतर्गत तरतूदीनुसार मतदान पध्दतीने निवडणूक घेण्यात येईल आणि ते फेरनिवडणूकीस पात्र राहतील.

**१२) संघाचे व्यवस्थापन :**

श्रमिक संघ अधिनियम १९२६ यातील कलम २१ च्या उपविधीच्या अधिन राहून व्यवस्थपन समिती याची वित्तविषयक आणि इतर कार्ये ही पदाधिकारी व सर्वसाधारण वार्षिक सभेत निवडून आलेले इतर सदस्य याचा समावेश असलेल्या व्यवस्थापन समितीकडून चालविले जाईल. व्यवस्थापन समितीचा कार्यकाल ३ वर्षाचा रहील.

**१३) व्यवस्थापन समितीचे कर्तव्ये :**

सर्वसाधारणपणे संघाच्या ध्येय धोरणानुसार संघाचे व्यवस्रूथापन करणे नवीन सभासदाचे संघाचे सभासदत्त्ववाचे  अर्ज मंजूर करणे, असा अर्ज मंजूर करून घेणे किंवा न घेणे याबाबत व्यवस्थापन समितीचा निर्णय अंतीम राहील.

संघाची आय – व्यय संबंधी व्यवस्था करणे, संघाच्या उद्दीष्टासाठी योग्य ते कार्यक्रम आखणे ट्रेड सुनीयन अधिनियम व अन्य कायद्यासंबंधी जागरूक राहून संघाच्या हिताचे कामे करणे. संघाच्या सदस्यांना शिक्षीत करण्यासाठी अभ्यासवर्गाची योजना करणे, वार्षीक अहवाल तयार करणे अशा रितीने संघाचे व्यवस्थापन सुचारू पध्दतीने करणे.

**१४) रिकामी झालेली पदे भरणे :**

समितीच्या पदाधिकाऱ्यांचे एखादे पद रिकामे झाल्यास ते व्यवस्थापन समितीकडून स्विकृतीने भरण्यात येईल.

**१५) पदावरून काढून टाकणे :**

संघाच्या कोणत्याही पदाधिकाऱ्याला किंवा व्यवस्थापन सिमतीच्या एखाद्या सदस्याला लबाडी करण्याबाद्दल किंवा संघाच्या हिताविरूध्द वर्तन करण्याबद्दल सर्वसाधारण सभेच्या ३/४ सदस्याच्या बहुमताने काढुन टाकता येईल. मात्र काढुन टाकण्याच्या पुर्वी अशा पदाधिकाऱ्याला किंवा सदस्याला आपल्या वर्तनासंबंधी खुलासा करण्याची पुरेशी संधी देण्यात आली पाहिजे.

**१६) व्यवस्थापन समितीच्या बैठका :**

प्रमुख कार्यवाही अध्यक्षाशी विचार विनियमय करून ठरविल अशा दिवशी व अशा ठिकाणी महिन्यातून एकदा व्यवस्थापन समितीची बैठक घेतली जाईल.

गणपूर्तीसाठी व्यवस्थापन समितीच्या कमीत कमी २/३ सदस्यांची उपस्थिती आवश्यक असेल, तहकूब केलेल्या बैइकीसाठी गणपूर्तीची आवश्यकता नाही.

व्यवस्थापन समितीच्या बैठकीबाबत कमीत कमी तीन दिवस अधी सुचना दिली जाईल.

**१७) पदाधिकाऱ्यांची कर्तव्ये :**

**अध्यक्ष आणि उपाध्यक्ष :** अध्यक्ष हे संघाच्या व व्यवथापन समितीच्या सर्व बैठकीचे अध्यक्षस्थान स्विकारतील सुव्यवस्था राखतील, सर्व कार्यवृत्तावर सहया करतील आणि त्यांना केवळ निर्णयक मत देता येईल. आवश्यक असेल तेव्हा व्यवस्थ्ज्ञापन समितीच्या किंवा संघाच्या विशेष बैठकी बोलावण्याचा अधिकार अध्यक्षाला राहील. (अध्यक्षाच्या अनुपस्थितीत उपाध्यक्षापैकी एक उपाध्यक्ष अध्यचक्षाने काम पाहील.

अ) जिल्हा उपाघ्यक्ष : हे त्या त्या जिल्हयातील सभासदांच्या समस्या जणून घेतील त्याबाबत अध्यक्षांशी विचार विनिमय करून आवश्यक त्या वाटाघाटी करून समस्याचे निराकरण करतील व त्याबाबत वेळोवेळी अध्यक्ष किंवा सचिव यांना अहवाल सादर करतील.

**१८) सचिव :**

सचिव संघाच्या व सिमतीच्या सर्व बैठकीचे कार्यवृत्त लिहून घेतील. सर्व पत्रव्यवहार सांभाळतील सर्व बैठकी बोलावतील सर्व हिशेब ठेवतील संघाच्या कामकाजावर देखरेख ठेवतील आणि सर्व पावत्यावर अचुक हिशेब ठेवतील ते दरवर्षी संस्थेची व खर्चाची प्रत्येक बाब स्पष्टपणे दर्शविणाऱ्या ताळेबंद तयार करतील. श्रमिक संघ अधिनियम १९२६ अन्वये श्रमिक संघ निबंधकाकडे पाठवावयाची सर्व विविरणे व सुचना त्या अधिकाऱ्याकडे सादर करण्याबाबत ते जबाबदार राहतील अध्यक्षांशी विचार विनियम करून आणि व्यवस्थापन समीतिच्या मान्यते अधिन राहून त्यांना आवश्यक वाटतील इतके सहाय्यक संघटनेच्या व लेखनविषयक कामकाजासाठी लावण्याचा अधिकार असेल सर्व सहाय्यक सचिवाच्या नियंत्रणाखाली असतील.

**१९) सहाय्यक सचिव :** सचिवाच्या अनुपस्थितीत सहाय्यक सचिव सचिवाचे काम पाहतील.

अ) जिल्हा सहसचिव : त्या त्या जिल्हयातील सभासदांच्या तक्रारी घेतील त्यांनी नोंद ठेविल आणि जिल्हा उपाध्यक्षांशी तक्रारीबाबत चर्चा करून सभासदांच्यातक्रारी सोडविण्यास सहकार्य करीतल तसेच केलेल्या कामाचा लेखाजोखा ठेविल.

**२०) कोषाध्यक्ष :** संघाकडे वेळोवेळी भरण्यात येणाऱ्या सर्व रकमा आणि त्याचा बँकेत होणारा यथायोग्य भरणा याबद्दल कोषाध्यक्ष जबाबदार राहतील समितीने मंजूर केलेल्या सर्व खर्चासाठी ते रकमा देतील परंतु धनादेशावर प्रथम अध्यक्षाची किंवा सचिवाची सही असल्याखेरीज त्यांना बँकेतून पैसे काढण्याचा अधिकार असणार नाही.

**अ) जिल्हा सहकोषाध्यक्ष :**

त्या त्या जिल्हयातील सभासदांकडून जमा होणाऱ्या सर्व रकमा आणि त्याचा बॅकेत होणारा यथायोग्य भरणा याबद्दल सहकोषध्यक्ष जबाबदार राहतील. जिल्हा समितीच्या कामासाठी ते रकमा देतील परंतु धनादेशवर प्रथम उपाध्यक्षांची किंवा सहसचिवाची सही अध्यक्षाखेरीज त्यांना बँकेतून पैसे काढण्याचा अधिकर असणार नाही.

त्यासाठी संघाच्या सर्व सदस्याची सर्वसाधारण वार्षिक सभा जानेवारी किंवा फेंबुंवारी महिन्यात घेण्यात येईल.

अ) संघाने केलेल्या कार्याच्या अहवाल आणि हिशेबाची लेखापरिक्षात विवरणपत्रे स्विकृत करणे.

ब) चालू वर्षासाठी व्यवस्थापन समितीवरील पदाधिकारी आणि सदस्याची निवड करणे.

क) अध्यक्षाच्या परवानगीने पुढे मांडण्यात येईल असे इतर कमाकाज चालविणे.

**२२)** अध्यक्ष किंवा सचिव हे त्यांना आवश्यक वाटेल त्यावेळी संघाच्या सदस्याची सर्वसाधारण सभा बोलावून शकतात सद्याच्या एकूण सदस्य संख्येच्या १/५ सदस्यांची आपल्या सहीनिशी मागणी केल्यावर अशी मागणी मिळल्यापासून २० दिवसाच्या आत तशी सभा घेण्याचा अधिकार राहील आणि या सभेचे कामकाज संघाला बंधनकारक राहील.

**२३)** सर्वसाधारण सभेकरिता सदस्यांना कमीत कमी १५ दिवस आधी सुचना देण्यात येईल.

**२४)** सर्वसाधारण सभेच्या गणपूर्तीकरिता कमीत कमी ३/४ सदस्यांची उपस्थ्ज्ञिती आवश्यक आहे. गणपूर्तीच्या अभावी तहकूब केली सभा अर्ध्या तासानंतर त्याच ठिकाणी त्याच दिवशली घेता येईल. व या सभेला गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही.

**२५) सर्वसाधारण निधी :**

अ) संघाने सर्वसाधारण निधीमध्ये सदस्याकडून मिळणारी वर्गणी देणग्या इत्यादीचा समावेश असले हे निधी व्यवस्थापन समितीने मान्य केलेल्या बँकेत संघाचे नावाने ठेवण्यात येईल. या खात्याचे काम कोषपाल आणि अध्यक्ष किंवा प्रमुख सचिव यांचेपैकी एकजन पाहतील सचिव किंवा कोषपाल चालु खर्चासाठी रू. ५००/— पेक्षा अधिक रक्कम स्वत:जवळ ठेवू शकणार नाही.

ब) संघाच्या ध्येयपूर्तीसाठी आवश्यकतेनुसार अनुदानाद्वारे निधी उभारला जाऊ शकेल केन्द्रीय कामगार शिक्षण बोर्ड मार्फत ग्रॅट—इन—एड योजनेअंर्गत कामगारासाठी शैक्षणिक सत्रे चालविण्यासाठी अनुदान घेता येईल. अन्य प्रकारे कामगारांनी दिलेल्या देणग्या इत्यादीच्या निधीत समावेश राहील. शिवाय कोर्टातील केसेस चालविण्यासाठी सदस्याकडून किंवा अन्य व्यक्तीकडून एकत्रित केलेल्या निधीचा यात सामवेश रहील.

**सर्वसाधारण निधीतून ज्यावर खर्च करावयाच्या अशी उद्दीष्टे :**

**२६)** इंडीयन ट्रेड युनीयन अधिनियम १९२६च्या कलम १५ मधील उपनियमामधील अधीन राहून संघाच्या सर्वसाधारण निधीतील रकमा खालील उद्दहीष्टाशिवाय अन्य कोणत्याही उद्दीष्टासाठी खर्च करयात येऊ नये.

क) संघाच्या अधिकाऱ्याचे वेतन व भत्ते देणे.

ख) संघाच्या सर्वसाधारन निधीच्या लेखा परिक्षणाच्या खर्च, प्रशासनाचा खर्च चूकता करणे.

ग) संघाचे म्हणून असे कोणतेही अधिकार किंवा एखाद्या सदस्याचे पेट्रोलियम उद्योगाने किंवा राज्य किंवा केंद्र शासनाने कोणतीही अनुचीत कार्यवाही केल्यास त्यात संघातर्फे किंवा सदस्य स्वत:कोर्ट कार्यवाही किंवा मध्यस्थी करणे बचाव करणे.

घ) संघाच्या किंवा संघाच्या एखाद्या सदस्यांच्या वतीने कोर्ट कार्यवाही किंवा मध्यस्थी करणे.

ड) वाद किंवा तंटयामुळे झालेल्या हानीबद्दल सदस्यांना नुकसान भरपाई मिळवून देण्याकरिता उद्योगाशी मध्यस्थी करणे.

इ) मुख्यत्वेकरून पेट्रोलीयम उत्पादनाशी निगळीत किंवा संबंधीत असलेल्या प्रश्नांची चर्चा करण्याकरिता व प्रसिध्द होणारे नियतकालीन चालू ठेवणे.

ई) संघाच्या सर्वसाधारण निधी ज्यावर खर्च करता येईल अशा कोणत्याही प्रकारचा उद्दिष्टासाठी रकमा देणे, साधारणता सदस्यांना कायदेशीर ठरवतील अशा कोणत्याही कारणासाठी अंशदान करणे परंतु अशा दान संबंधीचा खर्च त्यावर्षामध्ये संघाच्या सर्वसाधारण निधीमध्ये त्यावेळेपर्यंत सूचीत असलेले स्थूल उत्पन्न आणि त्या वर्षाच्या प्रारंभी निधीत जमा असलेली शिल्लक रक्कम या दोघेच्या बेरजेच्या १/४ पेक्षा अधीक असता कामा नये.

**२७) वार्षिक लेखा परिक्षण :** मुंबई श्रमिक संघ विनिमय १७२७ च्या कलम १८ नुसार व्यवस्थापक समितीने नियुक्त केलेल्या लेखा परिक्षकाकडू संघाच्या हिशेबाची वार्षिक लेका परिक्षा करण्याबाबत संघ योग्य तरतूद करील.

**२८) लेखा पस्तकाची तपासणी :** संघाची लेखा पुस्तक कार्यालयात सुटीचे दिवस सोडून इतर कोणत्याही दिवशी कार्यालयीन वेळेमध्ये खुली ठेवण्यात येतील.

**२९) नियमातील दुरूस्ती :** सर्वसाधारण सभेत उपस्थित असलेल्या ३/४ किंवा एकूण सभासद संख्येत २/३ सदस्यांच्या बहुमताने कोणत्याही वेळी नियमात दूरूस्ती, फेरफार पुर्नस्थापना निवाडा करता येईल. परंतु अशा फेरफारासाठी सदस्यांना कमीत कमी सात दिवस आधी सुचना दिली पाहिजे आणि सदरहू दुरूस्ती ही श्रमिक संघ

अधिनियम १९२६ च्या कलम २८(३) नुसार सर्वसाधारण सभा झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत दुरूस्ती प्रस्ताव उपनिबंधक श्रमिक संघ अधिनियम १९२६ नागपूर यांचेकडे सादर करून त्यास मंजूरी प्राप्त झाल्याशिवाय त्यावर अमल करता येणार नाही.

**३०) संघाचे विघटन :** संघाचे विघटन त्या प्रयोजनासाठी बोलविलेल्या सभेत उपस्थित असलेल्या सदस्यापैकी १/४ सदस्यांचे व बहुमत असल्याशिवाय केले जाणार नाही. मात्र अशा सभेत पडलेल्या मतांची एकूण संख्या संघाच्या पटावरील एकूण सदस्य संख्येच्या २/३ पेक्षा कमी नसली पाहीजे. सर्व दायित्वे भागविल्यानंतर संघाच्या उरलेल्या निधीचा विनियोग कायदेशिररित्या करण्यात येईल.

**अध्यक्ष** **सचिव**